# आयुष्यात गुरुचे स्थान महत्वाचे

## मनोहर सारडा : गुरुकुल संगीत विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त कार्यक्रम

सांगली / प्रतिनिधी

आयुष्यात गुरूचे स्थान अत्यंत मोलाचे असते. गुरू आणि शिष्याचे नाते जीवनाला दिशा देऊन जाते. यामुळे विद्यार्थ्यांनी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर गुरूकडून शिकत राहिले पाहिजे, असे मत सामाजिक कार्यकर्ते मनोहर सारडा यांनी व्यक्त केले.



सांगली : राग भूप, यमन बिहाग रागासह बंदिशी सादर करताना विद्यार्थी.

सांगलीतील संगीताचार्य द. वि. काणेबुवा प्रतिष्ठान संचलित गुरुकुल संगीत विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सारडा म्हणाले, वयाच्या चौथ्या वर्षापासून मी कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात नेहमी भाग घेत राहिलो. सांगली जिल्हा ॲथलेटिक संघटनेतर्फे आजवर ग्रामीण भागातील मुलांना स्पर्धेसाठी सहकार्य केले आहे. गुरुकुलच्या माध्यमातून सांगलीत संगीताचे ज्ञान देणारे व्यासपीठ निर्माण झाले आहे. संस्थेच्या पाठीशी यापुढे कायम राहू. प्रारंभी संस्थेच्या संचालिका मंजुषा पाटील यांच्याहस्ते सरस्वती पूजन आणि गुरू पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

गुरुकुलमधील मुलांनी राग भूप, यमन बिहाग रागासह बंदिशी सादर केल्या. ज्येष्ठ शिष्यांनीही यावेळी गायन सेवा केली. त्यांना नीलेश काळे यांनी तबला साथ केली. कार्यक्रमाच्या शेवटी गुरुकुलच्या संचालिका मंजुषा पाटील यांनी भैरवी सादर केली. पुष्कर नाशिककर, सौम्य कोटणीस, तन्मयी जोशी, शांभवी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गोविंद बेडेकर, निवासी गुरू कृष्णा मुखेडकर, राहुल पाटील यांच्यासह पालक उपस्थित होते.

Scanned with CamScanner